अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 30 एप्रिल 2026 | वर्ष 11 वे | अंक 37 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ब्रम्हपुरीच्या महिलेची लाखांदूरमध्ये निर्घृण हत्या

## चिमुकल्या मुलीच्या डोळ्यादेखत आईचा गळा चिरला

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील भागडी येथे एका ३० वर्षीय महिलेची तिच्याच नात्यातील दिराने धारदार शस्त्राने गळा चिरून अमानुष हत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवार दि. २७ एप्रिलला पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. स्वत:च्या पोटच्या चिमुरडीसमोरच आईचा जीव घेतल्याच्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाचे वातावरण पसरले आहे.

प्राप्त माहितीनुसार, माधुरी तुळसीदास अंबादे (वय ३० वर्ष, रा. ब्रह्मपुरी) असे मृत महिलेचे नाव आहे. रविवारी, २६ एप्रिल रोजी माधुरी या आपली मुलगी आणि संशयित आरोपी गौरव अंबादे (रा. ब्रह्मपुरी) याच्यासह पालांदूर येथील एका लग्न समारंभासाठी गेल्या होत्या. लग्नावरून परतताना उशीर झाल्याने त्यांनी भागडी येथील नातेवाईक नाजुका युवराज गणवीर यांच्याकडे मुक्काम केला. रात्री सर्वजण जेवण करून झोपले असताना पहाटे ३ वाजेच्या सुमारास ही काळजाचा थरकाप



उडवणारी घटना घडली.

पहाटेच्या सुमारास माधुरी यांची मुलगी जान्हवी हिच्या जोरात ओरडण्याचा आवाज आला. आवाजामुळे घरमालक नाजुका गणवीर यांना जाग आली. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता, संशयित आरोपी गौरव अंबादे हा घाईघाईने त्याच्या दुचाकीवरून पळून जात असल्याचे त्यांना दिसले. संशय आल्याने त्यांनी आत जाऊन पाहिले असता माधुरी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती.

आरोपीने माधुरी यांचे तोंड उशीने दाबून धारदार शस्त्राने तिचा गळा चिरला होता. धक्कादायक म्हणजे तिचे पाय स्कार्फने बांधलेले होते. शरीरावर इतर ठिकाणीही गंभीर जखमा आढळल्या आहेत. पोटच्या मुलीसमोरच घडलेल्या या अमानुष कृत्यामुळे उपस्थित सुन्न झाले. लाखांदूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. संशयित आरोपी गौरव अंबादे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. हत्येमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस अधिक तपास करत आहेत.

# ब्रम्हपुरीच्या ख्रिस्तानंद रुग्णालयातील शस्त्रक्रियागृह सील

## तीन रुग्णांनी दृष्टी गमावल्याने जिल्हा शल्य चिकित्सकाची कारवाई, चौकशी अहवाल मुंबईला पाठविला

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील अत्यंत नामांकित आणि सेवाभावी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ख्रिस्तानंद मिशनरी रुग्णालयावर आरोग्य प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर उद्भवलेल्या जंतुसंसर्गामुळे तीन रुग्णांना आपली दृष्टी गमवावी लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा शल्य चिकित्सकांनी रुग्णालयाची नोंदणी रद्द करून ऑपरेशन थिएटर आणि नर्सिंग होमशी



(संग्रहीत फोटो)

संबंधित महत्त्वाचे विभाग सील केले आहेत. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

अल्पदरात आरोग्य सेवा मिळत असल्याने ब्रह्मपुरी येथील ख्रिस्तानंद रुग्णालयात रुग्णांचा नेहमीच मोठा राबता असतो. मात्र, गेल्या काही दिवसांपूर्वी येथे झालेल्या मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर काही रुग्णांना जंतुसंसर्ग झाला. या संसर्गामुळे तब्बल तीन रुग्णांना आपली दृष्टी गमवावी लागल्याच्या गंभीर तक्रारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. तक्रारीची दखल घेत आरोग्य विभागाने तातडीने एक विशेष चौकशी समिती नियुक्त केली. या समितीने रुग्णालयाची प्राथमिक पाहणी केली असता तिथे नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे उघड झाले. 'बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट, १९४९' अंतर्गत असलेल्या अटींची पायमल्ली आणि प्रचंड अनियमितता समितीला दिसून आली. प्राथमिक अहवालानुसार, रुग्णालयात स्वतंत्र नेत्ररोग खाटा मंजूर नसतानाही तिथे अवैधरीत्या नेत्र शस्त्रक्रियागृह चालविले जात होते. आरोग्य विभागाने ठरवून दिलेल्या मानकांचे (Standards) पालन न केल्याचेही निदर्शनास आले आहे.

या गंभीर त्रुटींमुळे जिल्हा शल्य चिकित्सकांनी

**'ख्रिस्तानंद हॉस्पिटलमधील गंभीर अनियमिततेचा प्राथमिक अहवाल आम्ही मुंबई येथील नॅशनल ब्लाइंडनेस कंट्रोल प्रोग्रामच्या संचालकांकडे पाठवला आहे. सद्यःस्थितीत हॉस्पिटलचे ऑपरेशन थिएटर सील केले असून, संचालकांकडून आलेल्या अहवालानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.'**

**–डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर**

रुग्णालयाची नोंदणी (क्र. १०८) पुढील आदेशापर्यंत तात्काळ रद्द केली आहे. रुग्णालयातील सर्व शस्त्रक्रियागृहांना टाळे ठोकण्यात आले असून, बाह्यरुग्ण विभाग (OPD) मात्र सुरू ठेवण्यात आला आहे. रुग्णालयाचे प्रशासक फादर शिजो जॉर्ज पनायेलील यांना यावर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. याच दरम्यान, रुग्णालय प्रशासनाने फादर शिजो जॉर्ज यांची तडकाफडकी बदली

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# समय कठोर सत्य

मनुष्य की सबसे बड़ी विडम्बना यही है कि वह सत्य को नहीं, सुविधा को देखता है। एक ही घटना को दो अलग-अलग चश्मों से देखने की कला उसने इतनी बारीकी से सीख ली है कि अब उसे अपने भीतर की यह दोहरी मानसिकता भी दिखाई नहीं देती। जब घटना उसके पक्ष में हो तो न्याय, संविधान, नैतिकता और मानवता की बड़ी-बड़ी बातें सामने आ जाती हैं और जब वही घटना उसके विरुद्ध खड़ी हो जाए तो वही व्यक्ति चुप्पी ओढ़ लेता है, तर्क बदल देता है, परिभाषाएँ बदल देता है और कभी-कभी तो पूरा नैरेटिव ही बदल देता है। यह दोहरा चरित्र धीरे-धीरे समाज की आदत बन चुका है।

आज बहुत कम लोग सत्य के साथ खड़े होते हैं, अधिकांश लोग अपने लाभ के साथ खड़े होते हैं। यदि किसी अन्य के साथ अन्याय हो रहा हो तो लोग उसे एक सामाजिक घटना मानकर आगे बढ़ जाते हैं, लेकिन जैसे ही वही अन्याय उनके अपने दरवाजे पर दस्तक देता है, अचानक उन्हें न्याय, व्यवस्था और संवेदना की याद आने लगती है। यही मनुष्य की वह कमजोरी है जिसने समाज को भीतर से खोखला कर दिया है। मनुष्य यह भूल जाता है कि उसका ये खेल बहुत छोटा है। वह अपनी जाति, अपने पद, अपनी राजनीति, अपने प्रभाव और अपनी चालाकियों में इतना उलझ जाता है कि उसे लगता है जैसे यही अंतिम सत्य है। जैसे वही निर्णायक है, वही न्यायाधीश है, वही व्यवस्था है, परंतु ये एक बहुत बड़ा भ्रम है। क्योंकि ये जीवन स्थायी नहीं है, ये देह स्थायी नहीं है, ये शक्ति और प्रतिष्ठा भी स्थायी नहीं है।

समय एक ऐसा कठोर सत्य है जो किसी की सुविधा नहीं देखता। वह न राजा को बचाता है, न भिखारी को, न नेता को, न विद्वान को। सबको समान रूप से अपने प्रवाह में बहा देता है। जिस शरीर के घमंड में मनुष्य दूसरों को तुच्छ समझने लगता है, वही शरीर कुछ वर्षों बाद मिट्टी में मिल जाता है। जिस कुर्सी पर बैठकर लोग अपने शब्दों से दूसरों का भाग्य तय करते हैं, वही कुर्सी कुछ समय बाद किसी और के नीचे चली जाती है। और जिस भीड़ के सामने खड़े होकर लोग अपने प्रभाव का प्रदर्शन करते हैं, वही भीड़ बहुत जल्दी किसी और के पीछे खड़ी हो जाती है। लेकिन मनुष्य का भ्रम यहीं समाप्त नहीं होता। उसे लगता है उसके कर्मों का कोई लेखा-जोखा नहीं होगा। वह सोचता है कि यदि उसने अपने जीवन में चालाकी, पक्षपात और अन्याय से लाभ उठा लिया तो यही उसकी जीत है। परंतु यही वो जगह है जहां मनुष्य सबसे बड़ी भूल करता है।

क्योंकि इस संसार में चाहे मनुष्य की अदालतें कमजोर पड़ जाएं, चाहे समाज की स्मृति कमजोर हो जाए, चाहे इतिहास कई बातों को भुला दे लेकिन कर्म का लेखा कभी नष्ट नहीं होता। विधाता का जो न्याय है, वह मनुष्य की बनाई अदालतों से बहुत अलग है। वहां न कोई सिफारिश चलती है, न कोई पद काम आता है, न कोई जाति, न कोई भीड़, न कोई नारा। वहां मनुष्य अकेला खड़ा होता है बिल्कुल अकेला। वहां ये नहीं पूछा जाता कि तुम किस जाति के थे, किस पार्टी के थे, किस पद पर थे, कितने लोगों ने तुम्हें सलाम किया था। वहां केवल ये देखा जाता है कि तुम्हारे भीतर मनुष्यता कितनी थी, तुम्हारे निर्णय कितने न्यायपूर्ण थे और तुम्हारी नीयत कितनी स्वच्छ थी। जो व्यक्ति सत्य को जानते हुए भी सुविधा का पक्ष लेता है, जो व्यक्ति सत्ता के अहंकार में मनुष्यता को कुचल देता है, वो चाहे इस दुनिया में सम्मानित दिखे लेकिन उसके कर्मों की परछाई उससे कभी अलग नहीं होती। वह परछाई एक दिन उसके सामने खड़ी होती है, और जब वह क्षण आता है तो न कोई तर्क काम आता है, न कोई बहाना। तब ये स्पष्ट हो जाता है कि मनुष्य ने अपने जीवन को किस दिशा में जिया था। तब ये भी समझ में आता है कि जीवन का असली मूल्य पद, प्रतिष्ठा और प्रभाव में नहीं था, बल्कि उस ईमानदारी में था जिससे उसने दूसरों के साथ व्यवहार किया था। इसलिए जो लोग एक ही घटना को अपनी सुविधा के अनुसार दो चश्मों से देखते हैं, उन्हें शायद ये समझ लेना चाहिए कि ये खेल बहुत छोटा है। कर्मों का परिणाम अस्थायी नहीं होता। वह बहुत गहरा होता है और बहुत सटीक होता है। वहां किसी भी प्रकार की राजनीति, जात-पात, नेतागिरी या पद की विलासिता काम नहीं आती। वहां केवल सत्य खड़ा होता है और उसके सामने मनुष्य को अपने जीवन का पूरा लेखा-जोखा देना पड़ता है।

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगांव पांडवच्या विद्यार्थ्यांची एनएमएमएस परीक्षेत गगनभरारी

नागभीड/प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रह्मपुरी द्वारा संचालित, नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगाव पांडव येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षा २०२५-२६ मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या परीक्षेतील यशाबद्दल शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची मानाच्या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली असून संपूर्ण परिसरात त्यांचे कौतुक होत आहे.

शाळेतील एकूण ९ विद्यार्थ्यांनी ही कठीण परीक्षा उत्तीर्ण केली असून, त्यापैकी दोन गुणवंत विद्यार्थ्यांची ४ वर्षांच्या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. यात कु. वेदिका विद्याधर गजभिये (SC प्रवर्ग) व देवांशू मंगेश जिवतोडे (ST प्रवर्ग) यांचा समावेश आहे. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांत एकूण ४८,००० रुपये शिष्यवृत्ती स्वरूपात मिळणार आहेत. यामुळे



त्यांच्या पुढील शिक्षणाला मोठी आर्थिक मदत लाभणार आहे. या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदाने विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेतील आर. जी. फटाले : बौद्धिक क्षमता चाचणी (पेपर - १), वि. के. बेद्रे सर: गणित, कु. एम. एस. कुळे मॅडम: विज्ञान, कु. एल. बी. नवघडे मॅडम: सामाजिक शास्त्र या तज्ज्ञ शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे. शाळेत सध्या इयत्ता ५ वी ते ९ वी करिता मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

शाळेत विविध सुविधा उपलब्ध आहेत. त्यात NMMS व नवोदय परीक्षेसाठी अतिरिक्त वर्ग, सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा आणि अद्ययावत ग्रंथालय, कॅरियर मार्गदर्शन आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्ष, सांस्कृतिक कार्यक्रम, कला विकास आणि आरोग्य तपासणी शिबिरे, शिस्त आणि संस्कारांचे उत्तम वातावरण यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, शाळेच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गोसेखुर्द नहरासाठी अधिग्रहित जमीनधारकांना तात्काळ वाढीव मोबदला द्या - भाजप

## तनय देशकर यांच्या पुढाकारातून कार्यकारी अभियंत्यांना पत्र

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील गोसेखुर्द नहर प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित केलेल्या शेतकऱ्यांना



वाढीव मोबदला तात्काळ मिळावा, या मागणीसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या पुढाकाराने भाजपच्या शिष्टमंडळाने कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात गोसेखुर्द नहर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत योग्य व वाढीव मोबदला मिळालेला नसल्याचे नमूद करण्यात आले असून, तातडीने वाढीव दराने मोबदला मंजूर करून वितरित करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, त्यांना न्याय देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी, अन्यथा भाजपच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या प्रसंगी भाजपाचे प्रा. रामलालजी दोनाडकर, माणिक पाटील थेरकर, अविनाशजी मस्के, सोशल मीडिया संयोजक धीरज पाल, भाजपा मच्छीमार संघटनेचे बाळकृष्ण साखरे उपस्थित होते.

**जल है तो कल है...**

## विनोदिनी

मजिस्ट्रेट (मुजरिम से): 'तुम्हारा वकील कहाँ है?
मुजरिम : 'जनाब, मैं बहुत गरीब हूँ मैं वकील नहीं कर सकता।
मजिस्ट्रेट : देखो.. बाहर जाकर बहुत से ऐसे वकील है, जो सौ-सौ रुपये में पेश हो जाते है।
मुजरिम बाहर गया कुछ ही देर में वापस आ गया और बोला :
'जनाब बाहर वाले वकील कहतें हैं कि सौ-सौ रुपये में पेश होने वाले सब वकील 'मजिस्ट्रेट' बन गए। अब आप ही बताओं कहाँ से लाऊं वकील...!!!

# गोसीखुर्द प्रकल्प :
# ४३ वर्षांचा प्रवास अजूनही अपूर्ण कां...?

**प्रकल्प का रखडला ?**

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचा निर्णय १९८० मध्ये घेण्यात आला. २२ एप्रिल १९८८ रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले आणि विदर्भाच्या पाणीप्रश्नावर दीर्घकालीन तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर या तीन जिल्ह्यांतील सुमारे २.५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश होता. मात्र, सुरुवातीपासूनच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत सातत्याचा अभाव दिसून आला. प्रशासनिक विलंब, निधीअभाव आणि तांत्रिक अडचणी यामुळे कामाची गती मंदावली. कालांतराने हा प्रकल्प 'दीर्घकालीन प्रलंबित' प्रकल्प म्हणून ओळखला जाऊ लागला. ४३



वर्षांचा कालावधी उलटल्यानंतरही अपेक्षित परिणाम न दिसल्याने हा प्रकल्प विकासाच्या दृष्टीने एक अपूर्ण वचन ठरला आहे.

**धरण पूर्ण होऊनही पाणी शेतांपर्यंत का पोहोचत नाही ?**

गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य धरण बांधून पूर्ण झाले आहे आणि त्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठवण्याची क्षमता आहे. मात्र, या पाण्याचा उपयोग शेतीला होण्यासाठी आवश्यक असलेल्या कालव्यांची संपूर्ण व्यवस्था अद्याप तयार झालेली नाही. परिणामी, जलसाठा असूनही तो शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचत नाही. ही परिस्थिती 'मूलभूत सोयी-सुविधांतील उणीव'चे स्पष्ट उदाहरण आहे. धरण आणि कालवे या दोन घटकांमध्ये समन्वय नसल्याने प्रकल्पाचा लाभ अर्धवट राहतो. यामुळे शेतकऱ्यांच्या
अपेक्षा भंग पावतात आणि सार्वजनिक गुंतवणुकीचा पूर्ण उपयोग होत नाही. ही केवळ तांत्रिक समस्या नसून व्यवस्थापनातील त्रुटीचे द्योतक आहे.

**भूसंपादन अडथळा ठरला आहे का?**

प्रकल्पाच्या विलंबामागे सर्वात महत्त्वाचा अडथळा म्हणजे भूसंपादन प्रक्रिया. एकूण आवश्यक जमिनीपैकी बहुतांश जमीन संपादित झाली असली तरी उर्वरित काही हेक्टर जमीन अद्याप अधिग्रहित व्हायची आहे. या उर्वरित जमिनीशिवाय कालवे आणि वितरण यंत्रणा पूर्ण करणे शक्य नाही. जमीनमालकांचा विरोध, भरपाईवरील वाद, न्यायालयीन प्रकरणे आणि प्रशासकीय गुंतागुंत यामुळे ही प्रक्रिया लांबली. काही ठिकाणी पुनर्मूल्यांकनाच्या मागण्या झाल्या, तर काही ठिकाणी पुनर्वसनाबाबत असंतोष व्यक्त झाला. 'अंतिम टप्प्यातील अडथळे' ही संकल्पना या प्रकल्पात प्रकर्षाने दिसून येते. अल्प उर्वरित कामामुळे संपूर्ण प्रकल्प अडकून राहणे ही व्यवस्थापनातील कमतरता आहे.

**आराखड्यात बदल झाल्याने गुंता वाढला का?**

प्रकल्पाच्या सुरुवातीच्या आराखड्यात केवळ मुख्य धरण आणि डावा-उजवा कालवा यांचा समावेश होता.

राजेश्वर ठाकरे
rajeshwarthakare@expressindia. com

मात्र, कालांतराने प्रत्यक्ष गरजा आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन उपकालवे, उपसा सिंचन योजना आणि आसोलामेंढा धरण यांसारख्या पूरक कामांचा समावेश करण्यात आला. हे बदल आवश्यक असले तरी त्यांची अंमलबजावणी सुसंगत आणि वेळेत झाली नाही. प्रत्येक नवीन घटकामुळे प्रकल्पाची व्याप्ती वाढली आणि त्यासोबत भूसंपादन व निधीची गरजही वाढली.

विदर्भातील गोसीखुर्द सिंचन प्रकल्प हा कृषी परिवर्तनाचा आधार मानला जात असला, तरी चार दशकांनंतरही तो अपूर्णच आहे. धरण तयार असूनही शेतांपर्यंत पाणी पोहोचत नसल्याने नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवस्थापनातील त्रुटी पुन्हा चव्हाट्यावर आल्या आहेत. 'हनुमानाच्या शेपटाप्रमाणे' वाढत गेलेली ही व्याप्ती प्रकल्पाच्या विलंबाचे एक महत्त्वाचे कारण ठरली. नियोजनातील सातत्य आणि स्पष्टता नसल्याने अंमलबजावणी अधिक गुंतागुंतीची बनली.

**प्रकल्प खर्च ३७२ कोटींवरून २५ हजार कोटींपर्यंत कसा पोहोचला ?**

प्रकल्पाचा प्रारंभिक खर्च ३७२ कोटी रुपये होता, जो आता सुमारे २५,९७२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. ही वाढ केवळ महागाईमुळे नाही, तर व्यवस्थापनातील त्रुटींचा परिणाम आहे. कामे थांबणे, पुन्हा सुरू होणे आणि वेळेवर निधी न मिळणे या कारणांमुळे खर्च वाढत गेला. आर्थिक नियोजनात दीर्घकालीन दृष्टिकोनाचा अभाव होता. निधीचे
टप्प्याटप्प्याने नियोजन न केल्यामुळे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अस्थिर राहिला. काही ठिकाणी अनियमितता आणि अपारदर्शकतेच्या आरोपांमुळेही प्रकल्पाची प्रतिमा धोक्यात आली. परिणामी, हा प्रकल्प 'खर्चवाढ'चे ठळक उदाहरण बनला आहे.

**विस्थापित कुटुंबांचे पुनर्वसन अपूर्ण का आहे ?**

या प्रकल्पामुळे एकूण २६८ गावे बाधित झाली असून सुमारे १४,९८४ कुटुंबांना स्थलांतर करावे लागले आहे. पुनर्वसनासाठी ६४ वसाहती उभारण्यात आल्या असल्या तरी सर्व ठिकाणी सुविधा समाधानकारक नाहीत. अनेक ठिकाणी पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींचा अभाव असल्याच्या तक्रारी आहेत. विस्थापनामुळे सामाजिक असंतोष निर्माण झाला आहे. पुनर्वसन प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आणि स्थानिकांच्या अपेक्षा पूर्ण न होणे यामुळे प्रशासनावरील विश्वास कमी झाला. सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास मोठे प्रकल्प अडचणीत येतात, याचे हे उदाहरण आहे.

**उपसा सिंचन योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत का पोहोचत नाही ?**

उंच भागांमध्ये पाणी पोहोचवण्यासाठी टेकेपार, आंभोरा, मोखाबर्डी आणि नेरला या उपसा सिंचन योजनांची आखणी करण्यात आली होती. या योजना पूर्ण झाल्यानंतरही त्या कार्यान्वित झालेल्या नाहीत. त्यामुळे त्या भागातील शेतकरी अजूनही पावसावर अवलंबून आहेत. तांत्रिक अडचणी, वीजपुरवठा आणि व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे या योजना कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत. परिणामी, प्रकल्पाचा अपेक्षित प्रभाव मर्यादित राहिला आहे. (दै.लोकसत्ता वरून साभार)

# साहित्याचा विद्यार्थी हा सर्वगुणसंपन्न असावा

## डॉ. असलम शेख : पदव्युत्तर मराठी विभाग कार्यक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

'साहित्याचा विद्यार्थी हा इतर विषयांच्या विद्यार्थ्यांपेक्षा वेगळा असतो. तो जीवन कसे



जगावे, हे जगाला शिकवतो. कथा, कादंबरी, कविता, नाटकांतून जीवनाचे दर्शन त्याला घडते. तो त्यारुपाने संवाद साधतो. त्याच्यावर फार मोठी जबाबदारी असते, त्यामुळे साहित्याचा विद्यार्थी गुणसंपन्न असावा लागतो.' असे विवेचन डॉ असलम शेख यांनी नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील पदव्युत्तर मराठी विभागाद्वारे आयोजित कार्यक्रमात केले.

विचारपीठावर मराठी विभागप्रमुख, कवी डॉ धनराज खानोरकर, डॉ मोहन कापगते, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ मिलिंद पठाडे, डॉ राजू आदे, डॉ वर्षा चंदनशिवे, प्रा बालाजी दमकोंडवार उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पदव्युत्तर मराठी विभागातील जयश्री मोहुर्ले, अविनाश दहिकर यांनी विचार मांडले. कार्यक्रम प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, संचालन विकास मुळे तर आभार संजना दोनाडकरांनी केले. यशस्वीतेसाठी प्रा स्वाती धनविजय, प्रा गौरी टिकले व पदव्युत्तर मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# चांदली जि.प. शाळेत वाढदिवस व निरोप समारंभ

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदली येथे मुख्याध्यापिका संध्या वासनिक मॅडम यांचा



वाढदिवस तसेच इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश करंबे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष दीपक ठाकरे, शितल ढोरे, शिल्पा करंबे, गीता पिलारे, अंगणवाडी मदतनीस गोपिकाबाई डांगे, आशा वर्कर निराशा गणवीर, तसेच महेश बारसागडे व विष्णू गणवीर उपस्थित होते.

कार्यक्रमात इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर मुख्याध्यापिका संध्या वासनिक मॅडम यांचा वाढदिवस आनंदात साजरा करण्यात आला. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना भेट म्हणून पाण्याच्या बाटल्या देण्यात आल्या.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक वैकुंठ टेंभुर्णे यांनी केले.

# ब्रम्हपुरीत दिवसाढवळ्या निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या घरी धाडसी घरफोडी

## घरातून ११ लाखांचे दागिने लंपास, दोन आरोपींचा शोध सुरू

ब्रम्हपुरी /का.प्र.

शहरातील आरमोरी रोडवरील कृष्णा कॉलनी परिसरात एका निवृत्त पोलीस उपनिरीक्षकाच्या घरी भरदिवसा घरफोडी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाटातील ११ लाख १७ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ११ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रामचंद्र मारोती चापले (वय ५९), रा. कृष्णा कॉलनी, हे निवृत्त पोलीस उपनिरीक्षक आहेत. ते रविवार कुटूंबासह चामोर्शी येथे एका नातेवाईकाच्या लग्नासाठी गेले होते. घराच्या मुख्य दरवाजाला आणि लोखंडी गेटला व्यवस्थित कुलूप लावून ते बाहेर पडले होते. संध्याकाळी जेव्हा चापले कुटुंब घरी परतले, तेव्हा त्यांना लोखंडी गेट उघडल्यानंतर मुख्य लाकडी दरवाजाची कळी तुटलेली आढळली. घरात प्रवेश केला असता, बेडरूममधील लाकडी आणि लोखंडी आलमारीचे दरवाजे उघडे होते आणि घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते. चोरट्यांनी आलमारीतील लॉकर फोडून ४० ग्रॅमचा सोन्याचा राणी हार (किंमत ५.५२ लाख), २२ ग्रॅमचे सोन्याचे दोन गोफ (किंमत २.२० लाख), दोन सोन्याच्या अंगठ्या (किंमत ७५ हजार), सोन्याचे टॉप्स आणि नथ (किंमत ६५ हजार),१०.५० ग्रॅमची सोन्याची पोत (किंमत १.५५ लाख), व नगदी रक्कम: २,०००/- रुपये असा एकूण मुद्देमाल ११,१९,०००/- रुपये लंपास केला.

घटनेनंतर परिसरात चौकशी केली असता, शिवनगर येथील एका मुलाने महत्त्वाची माहिती दिली. दुपारी दोन अज्ञात इसम काळ्या रंगाचे कपडे घालून आणि तोंडाला काळा दुपट्टा बांधून विना क्रमांकाच्या मोटारसायकलने आले होते. ते संरक्षण भिंतीवरून चापले यांच्या घरात शिरताना दिसले आणि काही वेळाने उदापूर रोडच्या दिशेने पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच ब्रम्हपुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. रामचंद्र चापले यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५ (अ) आणि ३३१ (३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. एका निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या घरी अशा प्रकारे धाडसी चोरी झाल्याने शहरात सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पोलीस चोरट्यांचा कसून शोध घेत आहेत.

# काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा उघड करा -माजी आम. देशकर



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सिंदेवाही येथे भाजपा महिला मोर्चाच्या वतीने आयोजित भव्य महिला मेळावा प्रचंड उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या माध्यमातून महिला शक्तीचा विराट सहभाग पाहायला मिळाला असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने या क्षेत्रात मोठे शक्तिप्रदर्शन केले आहे.

केंद्र व राज्य सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविलेल्या 'लखपती दीदी', 'उज्ज्वला योजना' यांसारख्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना वक्त्यांनी काँग्रेसवर तीव्र निशाणा साधला. संसदेत महिलांना ३३ टक्के राजकीय आरक्षण देणाऱ्या विधेयकाला विरोध करून काँग्रेसने आपला महिला विरोधी चेहरा स्पष्ट केला आहे, अशी टीका करण्यात आली. महिला आरक्षणाचा गळा घोटणाऱ्या काँग्रेसची ही मानसिकता आता गावोगावी जाऊन जनतेसमोर उघड करण्याचा निर्धार महिला पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून ब्रह्मपुरी विधानसभा प्रमुख व माजी आमदार अतुलभाऊ देशकर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजपा जिल्हाध्यक्ष हरीशजी शर्मा, प्रदेश महामंत्री अर्चना गहाणे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे, ज्येष्ठ नेते प्रा. शेख सर, जिल्हा महामंत्री नीलिमा सुरमवार यांची उपस्थिती होती. या मेळाव्याला सिंदेवाही परिसरातील हजारो महिलांनी गर्दी केल्याने भाजपाची या क्षेत्रातील ताकद अधोरेखित झाली आहे. कार्यक्रमाचे संचालन संगीता बोरकर यांनी केले.

# शेतकऱ्यांना प्रलंबित मोबदला वाढ द्या

## ७ दिवसांचा अल्टिमेटम, अन्यथा तीव्र आंदोलन

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे लढाऊ नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांच्या नेतृत्वात तालुक्यातील आवळगाव, हळदा, बोडधा, कुडेसावली, मुडझा, बल्लारपूर, भुज, वांद्रा व गांगलवाडी, खेड , चांदगाव, मौशी परिसरातील बाधित शेतकऱ्यांच्या वतीने गोसेखुर्द उजवा कालवा विभाग कार्यालय सायघाटा येथे दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी धडक देऊन कार्यकारी अभियंता यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन वाढीव मोबदला रक्कम त्वरित देण्याची मागणी करण्यात आली.

गोसेखुर्द कार्यालयाचा कारभार आणि शेतकऱ्यांप्रती असलेली अनास्था या बाबतीत गंभीर बाबी शेतकरी नेते कॉम्रेड विनोद झोडगे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यात सन १९८४ पासून गोसेखुर्द प्रकल्पाचे काम सुरू झाले. या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल दराने अधिग्रहित करण्यात आल्या. मात्र, टेलच्या (शेवटच्या) शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचणे अशक्य आहे.

आदी समस्यांना धरून भाकपच्या वतीने बाधित शेतकऱ्यांचा थकीत व वाढीव मोबदला येत्या ७ दिवसांत त्यांच्या बँक खात्यात जमा करावा, नोटरी आणि कागदपत्रांच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून झालेली अतिरिक्त वसुली थांबवून पारदर्शक प्रक्रिया राबवावी, पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व कालव्यांची दुरुस्ती, गाळ काढणे आणि साफसफाईचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे आदी मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

वरील मागण्यांची दखल घेऊन येत्या ७ दिवसांत ठोस कार्यवाही झाली नाही, तर भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेच्या वतीने दिनांक ०५/०५/२०२६ रोजी गोसेखुर्द कार्यालयाला 'ताला ठोक' आंदोलन करण्यात येईल. यादरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाला प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच संजय लोणारे, माजी पोलिस पाटील पांडुरंग सावकार राऊत,चांदलीचे माजी सरपंच संदीप बगमारे, रामभाऊ येरावार, धनंजय नाकतोडे, नंदू ढोरे, विलास तलमले, रामदास तलमले, सदाशिव दमके, विजय लांडेकर, श्रीहरी घुटके, परसराम नखाते, राजेंद्र डोंबळे, लूमाजी राऊत, जिजाबाई गरमळे, मोतीराम राऊत, चेतन खोब्रागडे, चंदू मेश्राम यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# गौ संरक्षणासाठी ठोस राष्ट्रीय धोरण तयार करा

नागभीड/प्रतिनिधी

गौ (गाय) मातेला 'राष्ट्रमाता' घोषित करण्यात यावे तसेच देशभरातील गौवंशाच्या सुरक्षा आणि संवर्धनासाठी प्रभावी राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी 'गौ सन्मान आव्हान अभियान' अंतर्गत नागभीड येथे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन मान. राष्ट्रपती व मान. पंतप्रधान यांच्याकडे पाठविण्यासाठी तहसीलदार, नागभीड यांच्या माध्यमातून देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, देशातील अनेक भागांत गौवंशाची होत असलेली उपेक्षा, बेकायदेशीर वाहतूक आणि कत्तल या गंभीर समस्या असून, त्यावर तातडीने कठोर उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. गौवंशाच्या संरक्षणासाठी विशेष मोहीम राबवून, संबंधित कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यासोबतच, भटक्या जनावरांच्या वाढत्या समस्येवर उपाय म्हणून प्रत्येक जिल्ह्यात सुसज्ज गोशाळा उभाराव्यात, शेतकऱ्यांना जनावरांच्या पालनपोषणासाठी आर्थिक मदत व अनुदान द्यावे, तसेच पशुवैद्यकीय सुविधा ग्रामीण भागात अधिक सक्षम कराव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

निवेदन देतांना अजय काबरा, मनोज हंबर्डे, अशोक पिसे, शक्ती केराम, रवी मदनकर, सतीश कटारे, मनमोहन कलंत्री, दिनकर पाकमोडे, अतुल डोळस, विनोद मेहता, अतुल डोळस, आंनद काबरा, शुभम येरणे यांचेसह विश्व हिंदू परिषद, बजरंग दल तसेच माहेश्वरी समाज संघटनेचे पदाधिकारी, भारतीय गोरक्षण गोशाळा चे प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करा

## भूज ते मूडझा रस्त्याचे बांधकामाबाबत भाजपची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील भूज ते मूडझा या महत्त्वाच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्याच्या कामामध्ये दर्जाहीन साहित्याचा वापर, अपूर्ण काम आणि बांधकामातील त्रुटी यामुळे हा रस्ता अल्पावधीतच खराब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



या गंभीर बाबीची दखल घेत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या पुढाकाराने भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनामध्ये रस्त्याचे सुरू असलेले काम तात्काळ थांबवून ते उच्च दर्जाच्या मानकांनुसार नव्याने करण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली. तसेच संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. सार्वजनिक निधीचा अपव्यय थांबवून नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात आली. या प्रसंगी माजी सभापती प्रा. रामलाल दोनाडकर, भाजपा जिल्हा सचिव माणिक पाटील थेरकर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अविनाशजी मस्के, सोशल मीडिया संयोजक धीरज पाल, भाजपा मच्छीमार संघटनेचे बाळकृष्ण साखरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकसेवा ही गुड गव्हर्नर होय

## सेवा हक्क दिनी प्राचार्य डॉ. शेकोकर यांचे प्रतिपादन

ब्रह्मपुरी/का.प्र.

"कोणत्याही शासनाचे आद्य कर्तव्य हे लोकांना उत्तम सेवा देणे असते. या अनुषंगाने अलिकडे शासनाने गुडगव्हर्नर म्हणून अधिनियम २०१५ हा कायदा करुन त्याची अमंलबजावणी करण्यासाठी २८ एप्रिल सेवा हक्क दिन साजरा करुन या कायद्याचा जनतेत जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करण्यासाठी शासनाने क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. शासनव्यवस्थेत पारदर्शकता निर्माण करुन भ्रष्टाचारमुक्त भारत देश झाला पाहिजे याकरिता शासनाने हा कायदा अमंलात आणला आहे. तो कायदा जनतेला माहित होणे आवश्यक आहे. एखाद्या ग्राहकाचे शोषण होत असेल तर या कायद्यातंर्गत माहिती मागून आपल्या हक्क व अधिकाराचा वापर करावा, असे शासनाने धोरण आहे. आणि म्हणून शासनाने अधिनियम २०१६ हा क्रांतीकारी कायदा अमंलात आणून लोकांना उत्तम सेवा देणे हे गुडगव्हर्नर चे इतिकर्तव्य समजून जनतेत कायद्याचे प्रसार करण्यासाठी हा कायदा विद्यार्थी व नागरिकांनी समजून घेणे आवश्यक आहे," असे मौलिक मार्गदर्शन प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांनी सेवा हक्क दिनानिमित्त केले.



कार्यक्रमाचे आयोजन ने हि महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथिल महाराष्ट्र २० गर्ल्स बटालियन व एन सी. सी व एन एस एस विभागाच्या वतीने वाचनकक्षात करण्यात आले होते. यावेळी विचारपीठावर मेजर विनोद नरड, मराठीचे वक्ते, साहित्यिक डॉ.धनराज खानोरकर, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. के के गील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक डॉ. प्रकाश वट्टी यांनी केले तर आभार डॉ. के के गील यांनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# दिव्यांग लाभार्थ्यांना युडीआय कार्ड बंधनकारक

## ३० एप्रिलपर्यंत कागदपत्रे सादर करण्याचे तहसिलदारांचे आवाहन

ब्रम्हपूरी/का.प्र.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध निवृत्तीवेतन योजनांचा लाभ घेणाऱ्या ब्रम्हपूरी तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी आता 'युनिक डिसेबिलिटी आयडी' (UDID) कार्ड आणि प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही कागदपत्रे येत्या ३० एप्रिल २०२६ पर्यंत तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागात जमा करण्यात यावी.

ब्रम्हपूरी तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निनिवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. शासनाच्या नवीन धोरणानुसार, दिव्यांगत्वासंदर्भातील सर्व लाभांसाठी वैश्विक ओळखपत्र (UDID Card) बंधनकारक आहे.

### ०८ मे रोजी विशेष समाधान शिबीर

**ब्रम्हपूरी शहरातील लाभार्थ्यांच्या सोयीसाठी ८ मे २०२६ रोजी तहसील कार्यालयाच्या पहिल्या माळ्यावर सकाळी १० वाजता 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांना कागदपत्रे सादर करण्यात अडचणी येत आहेत, त्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सतीश मासाळ यांनी केले आहे.**

**विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास पुढील लाभ मिळण्यास तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करावी, असेही प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.**

१४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत आणि ३ फेब्रुवारी २०२६ च्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये झालेल्या निर्णयानुसार, आधार कार्डशी लिंक असलेले UDID कार्ड असणे आता अनिवार्य झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत लाभार्थ्यांना यापूर्वीच संदेशाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे.

लाभार्थ्यांनी आपले यु,डी,आय,डी प्रमाणपत्र, यु,डीआय,डी, कार्ड, आधार कार्ड आणि बँकेच्या पासबुकची प्रत ३० एप्रिलपर्यंत तहसील कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच, केंद्र पुरस्कृत योजनांच्या लाभार्थ्यांनी जवळील सेतू केंद्रात जाऊन आपले 'डिजिटल लाइफ सर्टिफिकेट' (डी, एल, सी) म्हणजेच हयात प्रमाणपत्र काढून घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच १ एप्रिल २०२६,३० जून २०२६, पर्यंत हयात प्रमाणपत्र जमा करणे अनिवार्य आहे.

### ... QUOTES ...

**"The whole world says that the losses are the heart but the heart says that once and try. You will definitely win."**

**- Unknown**

### चारोळी

*त्यांचा आमचा वाडा*
*अगदी शेम टू शेम...*
*आमच्या दारावर पाटी - 'शुभ लाभ',*
*त्यांच्या - 'कुत्र्यापासून सावधान'...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# गांगलवाडी-व्याहाड मार्गावर ड्रेनेजची निर्मिती करा

ब्रम्हपुरी/का.प्र.

गांगलवाडी-व्याहाड रोडचे काम सुरू असून या रोडवरील बरडकिन्ही व कुडेसावली येथे ड्रेनेज बनविण्यात यावे तसेच या मार्गावर ज्या ठिकाणी सि.सि.रोड बनत आहेत त्या ठिकाणी गाड्यांच्या येण्याजाण्यामुळे धुळीचे कण मोठ्या प्रमाणावर उडत असून त्या ठिकाणी पाणी मारण्यात यावे व रोडवरील प्रत्येक गावी दुभाजक(डिवायडर) तयार करण्यात येऊन स्ट्रिट लाईट(पथदिवे) लाऊन देण्यात यावे.

या मागण्यांचे निवेदन आज डि.सी.गुरुबक्षानी या कंट्रक्शन कंपनीचे मिश्रा यांना देण्यात आले. यावेळी मिश्रा यांनी चर्चा करुन सकारात्मक उत्तर दिले. निवेदन देताना गुरूदेव वाघरे तालुका कॉंग्रेस सरचिटणीस ब्रह्मपुरी, रुपेश बानबले सरचिटनीस चंद्रपुर जिल्हा युवक कॉंग्रेस कमिटी, ज्ञानेश्वर झरकर, नरेश नखाते माजी सरपंच, नरेश पाटिल राऊत हळदा, सचिन बदन पत्रकार बोडधा आदी उपस्थित होते.

नियमित वाचा
ब्रम्हपुरी समाचार

# स्वच्छ, सुंदर ब्रम्हपुरीचा मुखवटा उतरला

## धुळीचे साम्राज्य अन् मोकाट जनावरांचा शहराला विळखा

ब्रह्मपुरी/का.प्र.


'स्वच्छ आणि सुंदर ब्रह्मपुरी' अशा घोषणांचा डंका पिटणाऱ्या नगर परिषद प्रशासनाचा खरा चेहरा आता उघडा पडला आहे. शहरात मोकाट डुकरांचा उच्छाद, भटक्या जनावरांची दहशत आणि नॅशनल हायवेच्या कामामुळे उडणाऱ्या धुळीच्या लोंढ्यांनी ब्रह्मपुरीकरांचे जगणे असह्य केले आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन ढिम्म हलत नसल्याने, 'आम्ही नगर परिषदेला कर (Tax) नक्की कशासाठी भरायचा?' असा जळजळीत प्रश्न आता सामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे.

शहरातील तिवारी ले-आउट, समता कॉलनीसह अनेक भागांत मोकाट डुकरांनी घाणीचे साम्राज्य निर्माण केले आहे. घरासमोर, अगदी गेटपर्यंत डुकरांच्या विष्ठेमुळे दुर्गंधी पसरली असून नागरिकांना घरात राहणे कठीण झाले आहे. या दुर्गंधीमुळे साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली असून, ब्रह्मपुरी आता 'स्वच्छ' राहिली नसून 'डस्टबिन' झाली आहे की काय, अशी भीती व्यक्त होत आहे. तसेच सध्या उन्हाळ्याचे दिवस असून नॅशनल हायवेचे काम संथ गतीने सुरू आहे. या कामामुळे उडणाऱ्या धुळीने रस्त्याच्या कडेला असलेल्या घरांवर 'धुळीचे थर' साचले आहेत. श्वास घेताना फुफ्फुसात धूळ जात असल्याने लहान मुले आणि वृद्ध मोठ्या प्रमाणात आजारी पडत आहेत. शहरातील खाजगी आणि शासकीय दवाखाने रुग्णांनी ओसंडून वाहत आहेत, मात्र धूळ थांबवण्यासाठी पाणी मारण्यासारखे साधे उपायही संबंधित कंत्राटदार किंवा प्रशासन करताना दिसत नाही.

नवनियुक्त नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांकडे नागरिकांनी अनेकदा गाऱ्हाणी मांडली. मात्र, निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधींना जनतेच्या प्रश्नांचे सोयरसुतक उरलेले दिसत नाही. प्रशासकीय अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त असून त्यांना जनतेच्या आरोग्याशी काहीही देणेघेणे उरलेले नाही, अशी टीका आता जाहीरपणे होऊ लागली आहे.

जर येत्या काही दिवसांत मोकाट डुकरांचा बंदोबस्त झाला नाही आणि धुळीच्या त्रासातून सुटका मिळाली नाही, तर ब्रह्मपुरीची जनता रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल. वेळप्रसंगी नगर परिषदेचा कर भरणा रोखून धरण्याचा इशाराही संतप्त नागरिकांनी दिला आहे. 'आम्ही आमचे कर्तव्य बजावून वेळेवर टॅक्स भरतो, मग प्रशासनाने त्यांचे कर्तव्य विसरून आम्हाला नरकात का ढकलले आहे? लोकप्रतिनिधींनी आता तरी झोपेतून जागे व्हावे,' असा इसारा डॉ. बाळकृष्ण शेळके, प्रा. भाऊराव बांगरे यांचेसह संतप्त ब्रम्हपुरीकरांनी दिला आहे.

❀❀❀❀❀❀


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

## ब्रम्हपुरीच्या ख्रिस्तानंद रुग्णालयातील...

(पान क्र. १ वरून)

करून त्यांच्या जागी फादर शिबू मोनिपल्ली यांची नियुक्ती केली आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांनी या प्रकरणाचा प्राथमिक चौकशी अहवाल मुंबई येथील 'नॅशनल ब्लाइंडनेस कंट्रोल प्रोग्राम' (राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम) च्या सहसंचालकांकडे पाठवला आहे. या अहवालात रुग्णालयातील निष्काळजीपणावर स्पष्ट बोट ठेवण्यात आले आहे. आता मुंबईतील संचालकांकडून येणाऱ्या अंतिम अहवालानंतर दोषींवर नेमकी काय कठोर कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दिव्यांगांसाठी तहसिलमध्ये व्हिलचेअरची सोय करा

ब्रम्हपुरी/का.प्र.

शासनाने दिव्यांग व्यक्तिंसाठी अनेक योजना सुरू केलेल्या आहेत कि जेणेकरून



त्यांच जीवन सुखकर होईल, स्वावलंबी होईल. दिव्यांग व्यक्ति दैनंदिन जीवनात ते त्यांचे कार्य करण्यास असमर्थ असतात. कर्णयंत्र , चश्मे, बैसाखी, ट्रायसायकल, व्हील चेअर असे अनेक साधने शासनाकडून दिव्यांग व्यक्तिंना मोफत मिळत असतात.

ब्रम्हपुरी तहसिल कार्यालयात दिव्यांग महिला कार्यालयीन कामाकरीता आली होती , ती पायाने अपंग होती व ती बैसाखीचा आधार घेत चालत होती. तिला पायऱ्या चढता येत नव्हत्या. तहसील कार्यालयात रैम्प उपलब्ध आहे मात्र, रॅम्पवरून जाण्याकरीता व्हिलचेअर कुठे आहे. तिच्यासोबत असलेल्या व्यक्तीने अभ्यागतांच्या रूम मध्ये व्हीलचेअर चा शोध घेतला पण त्याला ती मिळाली नाही. शेवटी त्याने तिथली एक साधी लोखंडी खुर्ची आणली व त्यात तिला बसविले व दोन माणसांनी तिला उचलून पायऱ्यांवर कार्यालयात नेले.

शहरात तहसिल कार्यालयाची नवीनच भव्य इमारत बांधली आहे परंतु दिव्यांग व्यक्तिंसाठी आवश्यक त्या सोई नाहीत, व्हीलचेअर नसल्यामुळे या दिव्यांग व्यक्तींना त्रास सहन करावा लागतो. सर्वच दिव्यांग व्यक्तिंकडे ट्रायसायकल नसते. या दिव्यांग व्यक्तींच्या सोयीसाठी प्रशासनाने अभ्यागतां च्या रूममध्ये व्हीलचेअर उपलब्ध करून द्यावी अशी मागणी राजू भागवत यांनी उप विभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.

# बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे नगर व मार्गाच्या फलकाचे अनावरण



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नगरपरिषद हद्दीतील देलनवाडी वार्डातील नवीन वसाहत डॉ.देवेश कांबळे यांच्या घराजवळील परिसराला राज्यसभेचे माजी उपसभापती तथा रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस, बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे नगर' तथा राष्ट्रीय महामार्ग नागभिड रोड ते डॉ.देवेश कांबळे ते गोपाळराव खोब्रागडे यांच्या घरासमोरील रोडला बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे मार्ग असा नावाच्या फलकाचे अनावरण डॉ.देवेश कांबळे यांच्या हस्ते जीवन बागडे, मिलींद मेश्राम, प्रशांत डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी गोपाळराव खोब्रागडे, हेमंत उंदिरवाडे, श्रीरंग खोब्रागडे, भारत मेश्राम ,रामटेके पोलीस, अमित बनकर उपस्थित होते.

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404